Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास

**अमरदीप अरुणकुमार महाजन,** संशोधक
**डॉ. नंदा गेमू वसावे,** मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, नंदुरबार तालुका विधायक समितीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार
**डॉ. केतन चौधरी,** सह मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, के.सी.ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**सारांश:**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यात आला असून त्यासाठी सहसंबंधात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर हा संशोधकांकडून करण्यात आला. संशोधनातील निदर्शनाची निश्चिती करत असताना नमुना निवड पद्धतीचा वापर करून माध्यमिक स्तरावरील 120 विद्यार्थ्यांचा नमुना निवड करण्यात आली. माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर करून t मूल्य व r मूल्य या संख्याशास्त्रीय विश्लेषण केले असता असे दिसून आले की ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या नवीन दृष्टिकोन नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीच्या दृष्टिकोनात फरक आढळून येतो. तर नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीच्या दृष्टिकोन व शारीरिक मानसिक भावनिक समस्या यात मात्र सार्थ सहसंबंध दिसून येतो.

**प्रस्तावना :**

विद्यार्थ्यांच्या जीवनात तंत्रज्ञानाचा प्रभाव सतत वाढत आहे. डिजिटल साधने, स्मार्टफोन, संगणक, आणि इंटरनेटच्या सहज उपलब्धतेमुळे शिक्षणाचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. शिक्षणासाठी ऑनलाइन साधनांचा वापर, व्हिडिओ लेक्चर्स, ई-बुक्स आणि शैक्षणिक ॲप्स यांचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम होतो. मात्र, या तंत्रज्ञानाच्या सततच्या वापरामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक समस्या उद्भवू शकतात. विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन तंत्रज्ञानाकडे कसा आहे आणि त्याचा त्यांच्या आरोग्यावर आणि भावनिक स्थैर्यावर कसा प्रभाव पडतो, हे समजून घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा अत्यधिक वापर केल्याने विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक समस्या दिसून येतात. सतत स्क्रीनकडे पाहण्यामुळे डोळ्यांचा ताण, मानेचा आणि पाठदुखीचा त्रास, तसेच लठ्ठपणा यांसारख्या समस्या निर्माण होतात. शारीरिक हालचाली कमी झाल्यामुळे आरोग्याच्या अनेक तक्रारी वाढू शकतात. तंत्रज्ञानाचा योग्य प्रमाणात आणि संतुलित वापर करणे ही काळाची गरज आहे.मानसिक आणि भावनिक पातळीवरही तंत्रज्ञानाचा परिणाम होतो. सोशल मीडियावरील अवास्तव तुलना, आभासी विश्वातील अतिरेकी गुंतवणूक, तसेच सतत ऑनलाईन राहण्याची सवय यामुळे तणाव, नैराश्य आणि आत्मविश्वास कमी होण्याची शक्यता असते. तसेच, सतत डिजिटल माध्यमांवर असणाऱ्या माहितीच्या ओघामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता कमी होऊ शकते. यामुळे त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवरही परिणाम होतो. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर संयमाने आणि जबाबदारीने करावा, जेणेकरून त्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यावर होईल.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**समस्या विधान:**

विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे:**

1. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन सद्यस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे .
2. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक व भावनिक समस्याचा सद्यस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
4. शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

1. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन सद्यस्थितीचा माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक व भावनिक समस्याचा सद्यस्थितीचा माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
3. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील कोणताही सार्थ सहसंबंध नाही
4. शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील कोणताही सार्थ सहसंबंध नाही

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या:**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती.

**न्यादर्श:**

प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीने एकूण 120 माध्यमिक स्तरावरील मध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची न्यादर्श निवड करण्यात आला होता.

**संशोधनाचे साधने:**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी' संशोधक निर्मित प्रश्नावलीचा अवलंब केला होता.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**संख्याशास्त्रीय परिमाणे**

प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, मध्यमान, प्रमाणविचलन व 't', r मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता.


**माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वाचन**

विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास खालील प्रमाणे

**परिकल्पना 01:** ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन सद्यस्थितीचा माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**तक्ता क्रमांक 01:**

| नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण 60 | 120 | 22.78 | 5.42 | 2.00 | 4.51 | स्वीकार |
| शहरी 60 | | 32.00 | 6.14 | | | |





**विश्लेषण व अर्थनिर्वचन:** स्वाधीनता मात्रा (120) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 4.51 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार त्याग करावा लागेल यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन सद्यस्थितीचा माध्यमानत फरक दिसून येतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञान वापरा विषयी दृष्टिकोन अधिक विकसित आहे. प्राप्त माहितीवरून असे म्हणता येईल की शहरी भागातील विद्यार्थी हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा नवीन तंत्रज्ञान वापरा विषयी दृष्टिकोनात पुढे असतात.

**परिकल्पना 02 :** ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक व भावनिक समस्या सद्यस्थितीचा माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**तक्ता क्रमांक 02**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

| शारीरिक मानसिक व भावनिक समस्या | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण 60 | 120 | 45.59 | 9.42 | 2.00 | 5.40 | स्वीकार |
| शहरी 60 | | 39.40 | 11.40 | | | |




**विश्लेषण व अर्थनिर्वचन:** स्वाधीनता मात्रा (120) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 5.40 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार त्याग करावा लागेल यावरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक व भावनिक समस्या सद्यस्थितीचा माध्यमानत फरक दिसून येतो. शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक मानसिक व भावनिक समस्या अधिक आहे. प्राप्त माहितीवरून असे म्हणता येईल की, ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा शारीरिक मानसिक व भावनिक समस्या अधिक आहेत.

**3. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील कोणताही सार्थ सहसंबंध नाही.**

**तक्ता क्रमांक 03**

| ग्रामीण ( 60 N ) | Table 'r' value | Obtained 'r' value | Decision |
|---|---|---|---|
| नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन | 0.30 | 0.70 | स्वीकार |
| शारीरिक मानसिक व भावनिक समस्या | | | |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**निष्कर्ष**

तक्ता क्रमांक 3 वरून असे दिसून येते की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची नवीन तंत्रज्ञान विषयी दृष्टिकोन व शारीरिक मानसिक भावनिक समस्या यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरून असे म्हणता येईल की ज्या विद्यार्थ्यांची नवीन तंत्रविज्ञान वापराविषयी दृष्टिकोन अभिवृत्ती अधिक असते. त्यांना शारीरिक मानसिक भावनिक समस्या या कमी जाणवतात. तर ज्या विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचे दृष्टिकोन कमी प्रमाणात असतो त्या विद्यार्थ्यांना शारीरिक मानसिक व भावनिक समस्या जाणवतात. यावरून असे म्हणता येईल की, नवीन तंत्रविज्ञान वापरावीशी दृष्टीकोनाचा विद्यार्थ्यांच्या शारीरिक, भावनिक, मानसिक समस्येवर सकारात्मक परिणाम होतो.

4. **शहरी विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन व शारीरिक मानसिक व भावनिक समस्या यांच्यातील कोणताही सार्थ सहसंबंध नाही.**

**तक्ता क्रमांक 04**

| ग्रामीण ( 60 N ) | Table 'r' value | Obtained 'r' value | Decision |
|---|---|---|---|
| नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचा दृष्टिकोन | 0.30 | 0.68 | स्वीकार |
| शारीरिक मानसिक व भावनिक समस्या | | | |

**निष्कर्ष**

तक्ता क्रमांक 4 वरून असे दिसून येते की शहरी भागातील विद्यार्थ्यांची नवीन तंत्रज्ञान विषयी दृष्टिकोन व शारीरिक मानसिक भावनिक समस्या यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरून असे म्हणता येईल की ज्या विद्यार्थ्यांची नवीन तंत्रविज्ञान वापराविषयी दृष्टिकोन अभिवृत्ती अधिक असते. त्यांना शारीरिक मानसिक भावनिक समस्या या कमी जाणवतात. तर ज्या विद्यार्थ्यांच्या नवीन तंत्रविज्ञान वापरा विषयीचे दृष्टिकोन कमी प्रमाणात असतो त्या विद्यार्थ्यांना शारीरिक मानसिक व भावनिक समस्या जाणवतात. यावरून असे म्हणता येईल की, नवीन तंत्रविज्ञान वापरावीशी दृष्टीकोनाचा शहरी विद्यार्थ्यांच्या शारीरिक, भावनिक, मानसिक समस्येवर सकारात्मक परिणाम होतो.

**संदर्भग्रंथ सूची**

1. भितांडे, वि. रा. (2007), शैक्षणिक संशोधन पद्धती (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
2. पंडित, बी. बी. (2007), शिक्षणातील संशोधन. (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
3. मुळे व उमाठे. (1998), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. (तिसरी आवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.
4. जगताप , ह . ना . ( 2007), शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, नरेंद्र प्रकाशन.
5. पंडित बन्सी बिहारी ( 2005) . शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक) (प्रथम आवृत्ती) पुणे : नित्यनुतन प्रकाशन
6. भिताडे , वि. रा. ( 2008), शैक्षणिक संशोधनं पद्धती ( पुनमुद्रण ) पुणे : नुतन प्रकाशन .


Copyright © | JET Network, All Rights Reserved

7. कुलकर्णी डी. आर. (2008), प्रगत शैक्षणिक  मानसशास्त्र ( प्रथम आवृत्ती). नागपूर विद्या प्रकाशन
8. आगलावे प्र. (2007). सामाजिक संशोधन पद्धती. पुणे. पुणे विध्यार्थी गृह प्रकाशन
9. बर्वे. बी., ( 2006), ताण आणि आरोग्यविषयक मानसशास्त्र ( प्रथम आवृत्ती ) नागपुर:  विद्या प्रकाशन
10. घोरमोडे यु. के आणि घोरमोडे कला (2010) शैक्षणिक मागदर्शन  आणि समुपदेशन ( प्रथम आवृत्ती ) नागपूर : विद्यप्रकाशन
11. करंदीकर , सुरेश ( 2007) शैक्षणिक मानसशास्त्र ( द्वितीय आवृत्ती ). कोल्हापूर फड़के प्रकाशन
12. पाटील , वा . भा . (2017), संशोधन पद्धती , जळगांव, प्रशांत पब्लिकेशन.
13. देवगीकर आणि देवगीकर (2011), मन मनोविकास आणि समुपदेशन. नागपूर , श्रीसाईनाथ  प्रकाशन.


Copyright © | JET Network, All Rights Reserved